# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक २४४-२२** **दिनांक ०९/०८/२०२२**

## मोहरम मधील जुलुसमुळे नयानगर पोलीस ठाणे हद्दितील अति रहदारीच्या ठिकाणी अपघात / वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता पोलीस उप आयुक्तांची वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी.

दिनांक ०९/०८/२०२२ रोजी १६.०० वा. नयानगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोहरम सणानिमीत्त जुलुस मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदरची मिरवणूक "हैदरी मश्जिद ते हैदरी चौक—एनएच सर्कल- बँक ऑफ बडोदा कॉर्नर - रसाज सर्कलला ऊजवीकडे युटर्न घेऊन - अपोलो मेडीकल कॉर्नर—एचडीएफसी बँक कॉर्नर—युनीयन बँक कॉर्नरला डावीकडे वळून- व्हि केअर चेरीटेबल ट्रस्ट - वूडलॅन्ड शोरुम- ईशा वाईन्स (मिरारोड सर्कल) डावीकडे वळून- मातोश्री हॉस्पिटल-शरयु माताचौक (मच्छिमार्केट) - बापा सिताराम चौक पासून ऊजवीकडे वळून नवशा रुपा बाबर कब्रस्तान पर्यंत" अशा मार्गाने काढण्यात येणार आहे. सदर मार्गावर वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. यामुळे मिरवणूक मार्गस्थ होत असतांना सदर मार्गावर मिळणाऱ्या हमरस्त्यावरुन येणारी वाहने व जुलूस मधील नागरीक यांचा अपघात होऊ शकतो. तसेच वाहतूक प्रभावीत होऊन वाहतूक कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होऊ शकते. याकरीता जुलूस निघताना जुलूसच्या मार्गाला मिळणाऱ्या हमरस्त्यांवरील वाहतूक त्या-त्या वेळेला थांबवणे व सदर वाहनांना त्यावेळेस इच्छितस्थळी पोहचण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने श्री विजयकांत सागर, पोलीस उपायुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चेकलम ३३ (१)(ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११६(१) (अ)(ब) अन्वये पुढील प्रमाणे अधिसूचना जारी केली आहे.

दिनांक- ०९/०८/२०२२ रोजी दुपारी १६.०० वाजता ते रात्री २०.३० वाजेपर्यंत नयानगर पोलीस ठाणे हद्दीमधील खालील ठिकाणी जुलूस मार्गस्थ होत असताना_अत्यावश्यक सेवेतील वाहने (पोलीसांची वाहने, फायर ब्रिगेडची वाहने, ॲम्बुलन्स इ.) वगळता इतर वाहनांना प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात येत आहे. सदर वाहनचालकांनी खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

१. **प्रवेश बंद-** निहाल कॉर्नरते हैदरी मश्जिद - हैदरी चौकाच्या दिशेने जाताना
**पर्यायी मार्ग-** निहाल कॉर्नर ते इरानी बेकरी (लोढा रोड) - सरकार जंक्शन (मश्जिद उस्मान रोड) - बालाजी चौक - हैदरी चौकाचे दिशेने इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

२. **प्रवेश बंद -** एनएच स्कूलरोडने येऊनएनएच सर्कलचौकातूनहैदरी चौककिंवा रसाज सर्कलच्या दिशेने जाताना
**पर्यायी मार्ग-** एन एच सर्कल चौक ते एनएच स्कूल रोड मार्गे—शिवार गार्डन - हैदरी चौक किंवा रसाज सर्कल कडून इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

३. **प्रवेश बंद -** एव्हरशाईन रोडने बँक ऑफ बडोदाकॉर्नरते हैदरी चौककिंवा रसाज सर्कलदिशेने जाताना

**पर्यायी मार्ग-** बँक ऑफ बडोदा कॉर्नर ते–शिवार गार्डन - हैदरी चौक किंवा रसाज सर्कल कडून इच्छितस्थळी जाण्यास मुभा आहे.

४. **प्रवेश बंद-** रसाज सर्कल ते एलबीएस / नयानगर मार्गे - हैदरी चौकाकडे जाताना

**पर्यायी मार्ग** -एस. के. स्टोन चौक ते मनी पॅलेस (छत्रपती शिवाजी महाराज रोड) - शिवार गार्डनचौक - हैदरी चौकाकडे जाण्यास मुभा आहे.

५. **प्रवेश बंद -** निहाल कॉर्नर ते मिरारोड सर्कल मार्गे - सृष्टीच्या दिशेने जाताना

**पर्यायी मार्ग** – निहाल कॉर्नर ते हैदरी चौक - रसाज सर्कल– मिरा ॲल्युमिनीअम कॉर्नर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गे सेंट थॉमस हायस्कूल - फोटोवाले कॉर्नर - बाबा सिताराम चौकातून इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

६. **प्रवेश बंद** - रसाज सर्कल पासून स्टेशन रोडने येऊन वुडलँड शोरुम कॉर्नर ते मिरारोड सर्कलच्या दिशेने जाताना

**पर्यायी मार्ग** -रसाज सर्कल ते मिरा ॲल्युमिनीअम कॉर्नर–डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गे सेंट थॉमस हायस्कूल- फोटोवाले कॉर्नर - बाबा सिताराम चौकातून इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

**प्रवेश बंद करण्यात आलेल्या ठिकाणी जुलूस मार्गस्थ होईपर्यंतच वाहनांच्या प्रवेशास मनाई करण्यात आलेली आहे जुलूस सुरक्षीत किमान २०० मीटर अंतरापर्यंत मार्गस्थ झाल्यानंतर वाहनांना इच्छित स्थळी मार्गस्थ होण्यास मुभा राहणार आहे.**